**तकार युएलपी २४७/२०१७ (०७/०३/२०१९)           नि. यु—५७**

मी श्री. दिपक उत्तम भोई, नि. क्र. यु—५७ वर माझे प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे. यातील मजकुर खरा व बरोबर आहे, मला त्याव्यतिरीक्त काही सांगावयाचे नाही. सदरील प्रतिज्ञापत्रावर माझी सही आहे.

**जादाचा सरतपास तर्फे श्री. पोळ, वकील**

आता मला यादी नि. यु ३० सोबत असनारी कागदपत्रे दाखविणेत आली. आता मला यादी नि. क्र. यु ५० दाखविणेत आली त्यातील अ.क्र. ४ दाखविण्यात आली. सदरची कागद हे सॅम्पल स्लीपची कार्बन कॉपी आहे. त्यावर माझी सही आहे. सदरील कागदपत्रे माझे हस्ताक्षराचे आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास नि. यु ६१ देण्यात येत आहे. आता मला यु ५९ दाखविणेत आला. त्यातील अ. क्र. १ वर पेमेंट स्लीप आहे, जानेवारी २०१७ ची पेमेंट स्लीप आहे. त्यास यु ६२ देण्यात आले. अ.क्र. २ मधील कागद कंपेन्सेटरी ऑफ कार्ड आहे. त्यावर माझाी सही आहे. त्यावर इन्चार्ज, प्रोडकशन मॅनेजर व एच.आर. हेड ची सही असते. त्या मी ओळखतो. ते डिपार्टमेंट इन्चार्ज श्री महेश आदमने याची सही आहे. प्रोडक्शन मॅनेजर महादेव काळे याची सही आहे. हा कागद यु ६३ वर आहे.

**उलटतपास — श्री ए. आर. जोशी, वकील**

क्युरी मशिनवर ३ कामगार काम करतात. मी माझे प्रतिज्ञापत्रात कलम ३ मध्ये नमूद केलेप्रमाणे माझेसह अन्य २ ऑपरेटर असा उल्लेख आहे. मात्र ते भारतीय मजदूर संघाचे सभासद आहेत किंवा नाही हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी त्या दोन ऑपरेटरवर सुपरविजन करतो. हे म्हणणे खरे नाही की, ते दोन ऑपरेटर ग्रीनबेल्ट लावणे व साईट एज आयर्निंग करणे हे काम करीत होते. हे म्हणणे खरे आहे की, क्युरीक डिपार्टमेंट मध्ये एक सुपरवायजर असतो. हे मला सांगता येणार नाही की, तसेच ज्युनियर सुपरवायजर व ऑपरेटर सुध्दा काम करताातत. हे मला माहित नाही की. माझे शिफट मध्ये भारतीय कामगार संघाचे सभासद काम करत होते. हे म्हणणे खरे आहे की, डिफेक्ट क्युरींगचे काम ऑपरेटर करतो. हे म्हणणे खरे आहे की, एखादया प्रोडक्टमध्ये डिफेक्ट असल्यास ते शोधून सुपरवायजरला रिपोर्ट करायचे काम माझे हाते. हे म्हणणे खरे नाही की ती डिफेक्ट सापडल्यावर ते क्वालिटी डिपार्टमेंट ला पाठविणे हे काम माझे होते. हे म्हणणे खरे नाही की, मी सुपरवायझरला रिपोर्ट करायचो. लाईन बंद करावी असा रिपोर्ट केल्यास व तसे सुपरवायझर ने सांगीतल्यास मी लाईन बंद करायचो. हे म्हणणे खरे नाही की

औद्योगिक न्यायालय

क्वालिटी रिपोर्टनुसार लाईन चालविणे किंवा नाही की क्वालिटी रिपोर्ट आल्यावर त्याबाबत मला वरिष्ठांना रिपोर्ट करावी लागत असे.

हे म्हणणे खरे नाही की, प्रतिज्ञापत्र क्र. ३ मधील मजकुर चुकीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की प्रतिज्ञापत्र कलम ५ मध्ये स्कील मॅट्रीक्स मधील केला उल्लेख चुकीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिज्ञापत्र कलम ६ मध्ये जास्तीचा सुटया व कंपेन्सेसन ऑफ बदल माहिती चुकीची आहे. आज रोजी मी कामावरती आहे. आता मला प्रतिज्ञापत्रासोबत सी ९ दाखविणेत आले. सदरील कॅओर्ड बेल्ट किंवा सीट सॅम्पल कागदपत्रे आहे. त्यावर माझाी सही नाही. हे खरे नाही की, कामगार या व्याख्येत मी बसत नाही.

माझे मते मी ऑपरेटर म्हणून काम करीत होतो. हे म्हणणे खरे आहे की मी ऑपरेटर म्हणून कंपनीमध्ये काम करीत आहे असा नेमणूक आदेश या कामी दाखल केलेला नाही. हे म्हणणे चुकीचे आहे की,मी ऑपरेटर म्हणून कधीही काम केले नाही, म्हणून कंपनीने मला ऑपरेटर पदाचे नेमणूक पत्र दिले नाही. हे म्हणणे खरे आहे की मला जुनियर सुपरवायझर पदाचे नेमणूक पत्र देवून ऑपरेटरचे काम करून घेत असलेबाबतचे तक्रारीचा अर्ज माझे वरिष्ठांकडे किंवा न्यायालयात सादर केला नाही. हे म्हणणे चुकीचे आहे मी जुनियर सुपरवायझर पदाचे काम करीत असल्याबाबत गेल्या पाच वर्षात मी कंपनीकडे तशी तक्रार केली नाही.

हे म्हणणे खरे आहे की सामनेवाले कंपनी मध्ये भारतीय मजदूर संघ नावाची मान्यता प्राप्त संघटना आहे. हे म्हणणे खरे आहे की मी त्या संघटनेचा सभासद नाही. हे म्हणणे खरे आहे की, मान्यता प्राप्त संघटनेमध्ये काम करणारे कर्मचारी हे ऑपरेटर हुद्दयावर काम करणारे आहे. हे म्हणणे चुकीचे आहे की त्या ऑपरेटरस वर मी सुपरवायझर म्हणून काम करतो. हे म्हणणे खरे आहे की त्या सर्व कामगारांचे सेवाशर्ती ठरविण्याकरिता कंपनी व संघटनेमध्ये करार होतो. हे म्हणणे खरे आहे की आमचे सेवाशर्ती हे अप्रेझलनुसार दरवर्षी किंवा दोन वर्षे ठरतात. हे म्हणणे चुकीचे आहे की मी कामगार नसल्यामुळे मला अप्रेझल पद्दत लागू आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझा व भारतीय मजदूर संघ मधील कर्मचा—यांचा गणवेष वेगळा आहे. हे म्हणणे चुकीचे आहे की मी कामगार नसल्यामुळे माझा गणवेष वेगळा आहे. हे म्हणणे चुकीचे आहे की मला कंपनी परफॉरम्न्स बोनस देत असे.

कंपनीने २६ कर्मचा—यांना कमी केले आहे. त्यांची नावे सदरच्या तक्रारीत आहे.

हे म्हणणे खरे आहे की बेल्ट सेटींग हा ऑरेटरच्या कामाचा भाग आहे. तसेच लाईनर वायडिंग करायचे काम त्याचे असते. तसेच प्रोडॅक्शन मध्ये ग्रील बेल्ट तयार असतो व त्यावर होल पाडायचे काम ऑपरेटर करतो. तसेच मशीन मध्ये बेल्ट गेला व ते ओढायचे कामसुध्दा ऑपरेटरला करावे लागते. तसेच प्लॅटर वरती मोल्ड रीलीज स्प्रे ॲपलिकेशनचे काम सुध्दा ऑपरेटरला करावे लागते. प्रेसमध्ये बेल्ट ओढायचे काम वॉयडर बरोबर ऑपरेटर करतो. हे म्हणणे खरे आहे की, बेल्ट क्यूअर झाल्यावर अनलोड करायचे काम देखील ऑपरेटर करतो. शेल सेटींगचे काम देखील ऑपरेटरला करावे लागते. हे म्हणणे खरे आहे की सॅम्पल बेल्ट कटींग करून QAD ला पाठविला जातो. हे म्हणणे खरे आहे की बेल्टच्या आजूबाजूस पडलेले मटेरिअल असते ते कापण्याचे काम सुध्दा ऑपरेटर असते. हे म्हणणे खरे आहे की इलाईट क्लीनिंगचे काम सुध्दा ऑपरेटरला करावे लागते. तसेच या सर्व प्रक्रियातून स्क्रॅप निर्माण होते व ते स्क्रॅप यार्डात पाठविण्याचे काम ऑपरेटरचे आहे. हे म्हणणे चुकीचे आहे की प्रेस एरिया जवळील स्वच्छता करण्याचे काम देखील ऑपरेटरला करावे लागते. (साक्षीदार स्वत: सांगतो की मशीन पुरता भाग ऑपरेटर स्वच्छ करतो). हे म्हणणे खरे आहे की edge आर्यन बार्स हे स्टॅंडवर ठेवायचे काम ऑपरेटरला करावे लागते. प्लॅटर क्लीनिंग फारमॅटीक्स सेंडर हे काम ऑपरेटरला करावे लागते.

हे म्हणणे चुकीचे आहे की मला डेली प्रोडॅक्शन प्लॅन माहीत असे. हे म्हणणे चुकीचे आहे की सदर डेली प्रोडॅक्शन प्लॅन चा रीव्हीयू घेण्याचे काम मी करत असे. वर्क ऑर्डर म्हणजे पूर्ण माहीती नाही. परंतु बेल्ट नंबर आणि बेल्टचे स्पेसीफीकेशन एवढे माहीत आहे. ग्रीन बेल्ट म्हणजे कच्चा बेल्ट. हे म्हणणे खरे आहे की ग्रीन बेल्ट ऑपरेटर मशीन मध्ये लोड करतात. PLC & SCADA मला माहीत नाही. हे म्हणणे चुकीचे आहे की PLC & SCADA चे पॅरामीटर्स मी सेट करायचो. हे म्हणणे खरे आहे की ग्रीन बेल्ट क्युअरींग ज्या त्या वेळेस इन्सपेक्ट करावे लागायचे. हे म्हणणे खरे आहे की thickness आणी width मोजणे हे ग्रीन बेल्ट व क्युअर बेल्टचे काम सुध्दा मी करत असे. हे म्हणणे चुकीचे आहे की प्रेस मधले मेजर गॅप्स मी बघत असे. हे म्हणणे खरे आहे की प्रेशर टेंपरेचर आणि प्रेस चेक आणि मॉनिटर पॅरामीटर मी पाहत असे. हे

म्हणणे खरे आहे की प्रेस डेव्हियेशन काही आल्यावर वरिष्ठास सांगून काम थांबावावे लागत असे. सॅम्पल हे QAD ला आम्हीच देत असो.

हे खरे आहे की QAD कडून सॅम्पल रिपोर्टस मिळतो. तसेच सदरच्या रिपोर्ट मध्ये ऑपरेशन्स सुरू करण्यासाठी सूचना असते व नंतर प्रॉडक्शन चालू होते. हे म्हणणे खरे आहे की प्रत्येक शिफ्टला टारगेट ठरलेले असायचे. हे म्हणणे चुकीचे आहे की सदरचे झालेला प्रॉडक्शनचे रेकॉर्ड करावे लागते. हे म्हणणे चुकीचे आहे की ऑपरेशन मध्ये डाउन टाईम आल्यास तोही रेकॉर्ड करावा लागत असे. हे खरे आहे की प्रॉडक्शन मध्ये डाउन टाईम आल्यावर त्याची कारणे वरिष्ठांना कळवावी लागते. हे म्हणणे चुकीचे आहे की मशीनवर काम करणारे कामगार त्यांची सुरक्षा व प्रॉडक्ट बघण्याचे काम माझेकडे होते. (साक्षीदार स्वत: सांगतो की ते काम सुपरवायझर यांच्याकडे होते). हे म्हणणे चुकीचे आहे की मी सुपरवायझर असल्याने मीच काम पाहत होतो. हे म्हणणे चुकीचे आहे की भारतीय मजदूर संघटनेचे जे ऑपरेटर्स होते त्याचे सेफटी पाहण्याचे काम सुध्दा माझे होते. हे म्हणणे खरे आहे की एकदा बेल्ट अनलोड झाल्यावर टूग/लेवल लावायचे काम माझे होते. हे म्हणणे खरे आहे की cured बेल्टचे incpection ची जबाबदारी माझी होती. हे म्हणणे चुकीचे आहे की प्रॉडक्शनला लागणा—या मालाची यादी मला ध्यावी लागत होती. हे म्हणणे चुकीचे आहे की प्रॉडक्शनची चेक लिस्ट पाहून मी तयार करत असे. हे म्हणणे चुकीचे आहे की daily performance रिपोर्ट मला बोर्डावर लिहावा लागत असे. हे म्हणणे चुकीचे आहे की मी प्रॉडक्शन लाईनवर प्रॉडक्शनकरिता काम केले नाही. हे म्हणणे चुकीचे आहे की मी ऑपरेटर नसल्यामुळे कधी प्रॉडक्शन लाईनवर काम केले नाही. हे म्हणणे चुकीचे आहे की मी सुपरवायझरचे काम करीत होतो.

मला दरमाह रू. १४०००/— पगार होता. हे खरे नाही की मला जुनियर सुपरवायझर म्हणून नेमणूक करून माझेकडून प्रॉडक्शन लाईनचे घेतले जाते हे माझे म्हणणे खोटे आहे. हे म्हणणे चुकीचे आहे की माझे प्रतिज्ञापत्रातील कलम—२ मधील मजकूर खोटा आहे. हे म्हणणे चुकीचे आहे की मला काम करण्याकरिता सुपरवायझर सूचना देत होते हे माझे म्हणणे खोटे आहे. हे म्हणणे चुकीचे आहे की मी स्वत: मशीनवर काम करतो व सोबत दोन ऑपरेटर काम

करतात हे माझे कथन चुकीचे आहे. हे म्हणणे चुकीचे आहे की माझे प्रतिज्ञापत्रातील कलम—३ मधील मजकूर खोटा आहे. माझे प्रतिज्ञापत्रात कथन केलेले कलम—३ मी स्वत: हाताने काम करतो हे माझे म्हणणे खोटे आहे. हे म्हणणे चुकीचे आहे की माझे प्रतिज्ञापत्रातील कलम—४ ते १३ मधील मजकूर खोटा आहे. हे चुकीचे आहे की माझे कामाचे स्वरूप कलम—४ मधील वर्णन केल्यानुसार मी कामगार संज्ञात येतो हे कथन खोटे आहे. हे म्हणणे चुकीचे आहे की मी माझे प्रतिज्ञापत्रात वारंवार ऑपरेटरचे काम केल्याचे कथने, ते माझे म्हणणे खोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की, सुपरवायजरचे काम करीत असून येथे खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास काही नाही.

पुणे
दिनांक : ०७/०३/२०१९

(एम.आर. कुंभार)
सदस्य
औद्योगिक न्यायालय, पुणे

औद्योगिक न्यायालय